दूरध्वनी क्र. (थेट) (0240)2950507,
E-mail : cecadabd@gmail.com,
cewrdcada.abadwrd@maharashtra.gov.in

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,
**मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक,**
**लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग,**
लाभक्षेत्र विकास भवन, गारखेडा परिसर, पत्र पेटी क्र.560, छत्रपती संभाजीनगर 431005

जा.क्र.: लाक्षेवि(जसंवि)/ तां-1/925 दिनांक :- 13/03/2024

प्रति,

**अधिक्षक अभियंता व प्रशासक**
**लाभक्षेत्र विकास प्राधिकरण**
**लातूर**

विषय :- **केंद्र शासन पुरस्कृत असून 2.0 अभियान अंतर्गत लातूर शहर भुयारी गटार योजनेतील मलशुध्दीकरण केंद्र व पंपिग स्टेशनसाठी कातपूर तलावाच्या बुडीत क्षेत्रातील जागा वापरण्यासाठी ना-हरकत मिळणे बाबत.**

संदर्भ :- 1) महामंडळ कार्यालयाचे पत्र जा.क्र.गोमपाविम/न्यायप्र-4/धा-1746/2023/2388 दिनांक :- 12/03/2024.
2) अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण लातूर या कार्यालयाचे पत्र जा.क्र. लाक्षेविप्रा.लातूर/रेचिशा/543/सो. दिनांक :- 29/02/2024

संदर्भिय विषयास अनुसरून व आपले संदर्भीय पत्र क्र.2 नुसार शिफारस केल्याप्रमाणे लातूर शहर भुयारी गटार योजनेतील मलशुध्दीकरण केंद्र व पंपिग स्टेशनसाठी कातपूर तलावाच्या बुडीत क्षेत्रातील जागेवर बांधकाम करण्यासाठी खालील अटीच्या अधीन राहून ना हरकत कळवण्यात येत आहे.

1.विषयांकित कामाकरिता आवश्यक असणारी जमीन कायमस्वरूपी हस्तांतरित करण्याकरिताचा प्रस्ताव तयार करून आगामी नियामक मंडळात ठेवण्यासाठी त्वरित सादर करावा.

2.नियामक मंडळाच्या मान्यतेनंतरच प्रत्यक्षात जलसंपदा विभागाच्या मालकीच्या जागेवर बांधकाम करण्यात यावे.

3.लातूर महानगरपालिकेकडून नियामक मंडळाच्या मान्यतेनुसार आवश्यक जागेचे मुल्य भरण्याचे हमीपत्र घेण्यात यावे. हे हमीपत्र नियामकमंडळाचे प्रस्तावात जोडण्यात यावे.

स्थळ प्रत मुअ व मुप्र यांचे स्वाक्षरीत.

(रा. मा. देशमुख)
सहाय्यक मुख्य प्रशासक-1,
लाक्षेवि, जलसंपदा विभाग, छत्रपती संभाजीनगर

प्रत: कार्यकारी संचालक,गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ सिंचन भवन, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सविनय सादर

Ban